# नोंदणी व मुद्रांक विभाग
# महाराष्ट्र शासन

## नोंदणी उपमहानिरीक्षक मुंबई विभाग , मुंबई

**श्री.राजू थोटे**

**100 दिवसांची कार्यालयीन सुधारणा**
**विशेष मोहीम**

# मुद्दा क्र.1
# संकेतस्थळ

- नोंदणी व मुद्रांक विभागाचे https://igrmaharashtra.gov.in हे संकेतस्थळ आहे. सदरचे संकेतस्थळ नागरिकांना वापरण्याकरिता अत्यंत सुलभ व सोईचे (User Friendly) आहे.
- या संकेतस्थळावर विभागाच्या ऑनलाईन सुविधा, विभागाविषयी माहिती, प्रकाशने (कायदे, नियम, अधिसुचना, महत्वाचे दुवे (Link), सांख्यिकी, नागरीकांची सनद , सारथी पुस्तक माहिती प्रदर्शित करण्यात आलेली आहे
- संकेतस्थळावर माहिती अधिकार अधिनियमांतर्गत अपेक्षितसर्व माहितीचे स्वयंप्रकटीकरण केलेले आहे.
- लोकसेवा हक्कअधिनियमाअंतर्गत एकूण 15 सेवा बाबत माहिती प्रदर्शित करण्यात आलेली आहे.



## मुद्दा क्र.2 सुकर जिवनमान (Ease of Living)

1) मुंबई विभागातील नागरीकांच्या सोईसाठी मुंबई शहर जिल्हयातील एक दुय्यम निबंधक कार्यालय व मुंबई उपनगर जिल्हयातील अंधेरी बोरिवली व कुर्ला या तालुक्यातील प्रत्येकी एक दुय्यम निबंधक कार्यालय  शनिवार व रविवार या साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी सुरु करण्यात आलेले आहे.
2) मुंबई विभागातील नागरिकांच्या सोयी साठी सकाळी 7.30 ते 3.15 तसेच  दुपारी 1.00 ते 8.45या वेळेत कार्यालये सुरू ठेवण्यात आलेली आहेत.

# मुद्दा क्र.3 स्वच्छता

| अ. क्र. | निकषांबाबत केलेली कार्यवाही |
| --- | --- |
| अ) | या कार्यालयातील अभिलेखांचे निंदणीकरण व वर्गीकरण करण्यात आलेले आहे. |
| आ) | या कार्यालयातील जतन कालावधी संपलेले अभिलेखे नष्ट करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. |
| इ) | या कार्यालयातील जड वस्तू संग्रह नोंदवही अद्ययावतीकरण करण्यात आलेले आहे. |
| ई) | या कार्यालयात जुन्या व निरूपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट लावण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. |
| उ) | या कार्यालयाकडून 1 वाहनाचे निर्लेखन करण्यात आले असून माहे डिसेंबर 2024 मध्ये 1 नवीन वाहन या कार्यालयास प्राप्त झाले आहे. |

# मुद्दा क्र.3 स्वच्छता

## पुर्वीचे फोटो





## नंतरचे फोटो






# मुद्दा क्र.3 स्वच्छता

## अभिलेख निंदणीकरण, वर्गीकरण ,नाश करणे

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण पुर्ण केलेले एकूण गठ्ठे / संचिका | नाश केलेले अभिलेख/गठ्ठे/ संचिका | नष्ट करणेवर शिल्लक गठ्ठे / संचिका (2-3) |
|---|---|---|---|---|
| 1 | नोंदणी उपमहानिरीक्षक मुंबई | 527 | 101 | 0 |

# मुद्दा क्र.4 तक्रार निवारण

| अ.क्र. | निकषांबाबत केलेली कार्यवाही |
| --- | --- |
| अ) | 1 एप्रिल, 2025 पर्यंत आपले सरकार पोर्टलवरील 100% तक्रारींचे निराकरण केलेले आहे. |
| आ) | 1 एप्रिल, 2025 पर्यंत पी.जी.पोर्टलवरील 100% तक्रारींचे निराकरण केलेले आहे. |
| इ) | अभ्यागत भेटीचे नियोजन करून त्याबाबतचे फलक या कार्यालयात लावण्यात आलेले आहेत. |
| ई) | लोकशाही दिनामधील तक्रारींचे निराकरण – सदरबाबत जिल्हा पातळीवरील कार्यालयांकडून कामकाज करण्यात येते. |

## मुद्दा क्र.5 कार्यालयीन सोयी सुविधा

| अ.क्र. | निकषांबाबत केलेली कार्यवाही |
|---|---|
| अ) | या कार्यालयात स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. |
| आ) | या कार्यालयात कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी प्रसाधनगृहाची सुविधा करण्यात आलेली आहे. |
| इ) | या कार्यालयात महिला कर्मचारी व अभ्यागत यांच्यासाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची सुविधा करण्यात आलेली आहे. |
| ई) | या कार्यालयात अभ्यागतासाठी प्रतिक्षालय व्यवस्था करण्यात आलेली आहे. |
| उ) | या कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक, दिशादर्शक फलक व कार्यालयाचे सौंदर्यीकरणाचे कामकाज करण्यात आलेले आहे. |

# मुद्दा क्र.5 कार्यालयीन सोयी सुविधा

## प्रसाधनगृह




## पिण्याचे पाणी



## मुद्दा क्र.6 क्षेत्रकार्यालयांना भेटी

1. मुंबई विभागातील मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयातील सह जिल्हा निंबधक कार्यालयांना वेळोवेळी भेट देण्यात आलेली आहे.
2. मुंबई विभागातील 17 सह दूय्यम निबंधक कार्यालयाची तपासणी करून 100% उद्दीष्ट पुर्ण करण्यात आलेले आहे.

# मुद्दा क्र.7 ई-ऑफिस प्रणाली

| अ.क्र. | निकषांबाबत केलेली कार्यवाही |
|---|---|
| अ) | या कार्यालयातील टपाल शाखेमध्ये 100% ई-ऑफिस प्रणालीची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे |
| आ) | या कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे ई-ऑफिस प्रणालीत लॉगीन करण्यात आलेले आहे. |
| इ) | ई-ऑफिस कामकाज-01/01/2023 ते 31/03/2025<br>**1.E-Receipt Created and Moved - 5998**<br>**2. E-file Created and Moved - 1371** |

# मुद्दा क्र.8 आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन

| अ.क्र. | निकषांबाबत केलेली कार्यवाही |
|---|---|
| अ) | विभागाच्या विविध योजना व ऑनलाईन प्रणालींच्या प्रसिध्दीसाठी क्रेडाई (CREDAI) यांच्या मालमत्ता प्रदर्शन (Property Expo) मध्ये विभागाकडून दरवर्षी सहभाग नोंदविला जातो. |
| आ) | दस्त नोंदणी संदर्भातील अडचणी व ई-रजिस्ट्रेशन बाबत मार्गदर्शन करण्यासाठी क्रेडाई, नरेडको तसेच मराठी बांधकाम व्यावसायिक संघटना यांचेसाठी कार्यशाळा/बैठक वेळोवळी घेण्यात आलेली आहे. |





## मुद्दा क्र.9 अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण , सेवाविषयक बाबी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

| अ.क्र. | निकषांबाबत केलेली कार्यवाही |
| --- | --- |
| अ) | या विभागातील सर्व अधिकारी व कर्मचा-यांचे दि.31 मार्च 2024 पर्यंतचे गोपनिय अहवाल संस्करणासाठी प्राप्त झाले आहेत. |
| आ) | न्यायालयीन प्रकरणे – प्राधिकृत केलेल्या न्यायालयीन प्रकरणांत शपथ पत्र व परिच्छेद निहाय अभिप्राय सादर करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. |
| इ) | विभागीय चौकशी – या कार्यालयाकडे सोपविण्यात आलेल्या 11 विभागीय चौकशी प्रकरणामध्ये कार्यवाही पुर्ण करून अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात आलेले आहेत. |
| ई) | मुंबई विभागातील सर्व कर्मचारी व अधिकारी यांनी केंद्र शासनमार्फत विकसित केलेल्या iGOT या प्लॅटफॉमवर उपलब्ध कोर्सेस पैकी किमान 5 कोर्स पूर्ण केलेले आहेत. |

# मुद्दा क्र.10 नाविन्यपूर्ण उपक्रम

1. **नोंदणीसाठी सामाईक अधिकार क्षेत्र**

- नोंदणी व मुद्रांक विभागात दस्तनोंदणीचे एक राज्य एक नोंदणी संकल्पनेअंतर्गत दिनांक 17.02.2025 पासून मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन्ही जिल्हयांचे सामाईक कार्यक्षेत्र करण्यात आलेले आहे.
- मुंबई शहर जिल्हयातील 881 मिळकतीची दस्त नोंदणी मुंबई उपनगर जिल्हयामध्ये झालेली आहे.
- मुंबई उपनगर जिल्हयातील 883 मिळकतीची दस्त नोंदणी मुंबई शहर जिल्हयामध्ये झालेली आहे.

2. **ई-रजिस्ट्रेशन**

- फेसलेस दस्त नोंदणी प्रणीलीअंतर्गत बिल्डरकडील प्रथम विक्री करारनामा व सर्व पक्षकारांचे लिव्ह अॅण्ड लायसन्स (भाडेकरारनामा), नोटिस ऑफ इंटिमेशन प्रकारचे दस्त ऑनलाईन पध्दतीने नोंदविण्याची सुविधा उपलब्ध आहे.

**नोंदणी व मुद्रांक विभाग**

धन्यवाद